## FACILITIES AVAILABLE



Alcon Centurion Vision System, USA



Alcon constellation vision system, USA



Zeiss Lumera - I operating microscope, Germany


Zeiss IOL Master, Germany


Fundus Camera By Topcon, Japan


Optical Coherence Tomography System (O.C.T.) by Optovue USA



Tomey Specular Microscope


Corneal Topgraphy By Oculus


Green Laser Photocoagulator Gyc 1000, Nidek, Japan


Zeiss Humpfrey Field Analyser HFA-3, Germany


Eyelight Dry Eye Treatment, Italy


Alcon Verion


## डॉ. अनिल कुलकर्णी नेत्र रुग्णालय

२/२०,२१, हिरेमठ प्लॉट, वंटमुरे कॉर्नर जवळ, सांगली रोड, मिरज-४१६४१०

फोन:०२३३ २२११५६६/२२११६६६.मो.९१४२२११६६६

email : ameya.lasers @gmail.com / anilkeye@gmail.com

मिरज । पुणे । सातारा । चिपळूण


AKEH

# कुलकर्णी नेत्र रुग्णालय

Multispecialty Eye Hospital | Phaco Research and Training Centre

ISO 9001:2015 Certified

NABH ACCREDITED




WE CARE

# मोतीबिंदू (कॅटरॅक्ट)



www.dranilkulkarni.com


फोन:०२३३ २२११५६६/२२११६६६.मो.९१४२२११६६६

# डोळ्याच्या आतील नैसर्गिक पारदर्शक भिंग अपारदर्शक झाल्यास त्यास मोतीबिंदू म्हणतात.

## मोतीबिंदू कसा ओळखावा?

- त्रास न होता धुसर अथवा अस्पष्ट दिसणे.
- दिव्याभोवती वलय दिसणे.
- डोळे दिपणे /लख्ख प्रकाशात कमी दिसणे.
- रात्रीचे कमी दिसणे /धूसर दिसणे.

### मोतीबिंदू होण्याची कारणे

- वय वाढणे /वृध्दत्व
- डायबेटीस (Diabetes)
- शारिरीक आजार जसे सांधेदुखी,दमा या आजारांवर दिर्घकाळ घेतली जणारी औषधे (Steroids type)
- अपघातात डोळ्यांना मार बसणे
- डोळ्यांचे दीर्घकाळ आजार.

### मोतीबिंदू चे निदान कसे होते ?

नेत्रतज्ञ सखोल तपासणी व लक्षणांवरुन मोतीबिंदू चे निदान करतात.


### ऑपरेशन कधी करावे? मोतीबिंदू औषधे व Drops वापरून कमी होतो का?


मोतीबिंदू औषधोपचारांनी कमी होत नाही अथवा कायमचा जात नाही. शस्त्रक्रिया हाच यावर एकमेव उपाय आहे. मोतीबिंदू पूर्ण पिकल्यावर शस्त्रक्रिया करणे योग्य असते असे नाही. डोळ्यांचा आजार वाढल्यावर अथवा दैनंदिन काम करणे अडचणीचे झाल्यावर शस्त्रक्रिया करता येते.

### मोतीबिंदूची शस्त्रक्रिया कशा प्रकारे करतात?

शस्त्रक्रिया हाच मोतीबिंदू वर एकमेव उपाय आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान/अद्यावत तंत्रज्ञान जसे फेको इमलसीफिकेशन पध्दतीने शस्त्रक्रिया अचूकपणे करता येते. शस्त्रक्रिया करतेवेळी त्रास होत नसल्याने रूग्णास लगेच घरी सोडण्यात येते.





### फेको इमलसीफिकेशन म्हणजे काय ?

फेको इमलसीफिकेशन म्हणजे मोतीबिंदू ची बिनटाक्याची शस्त्रक्रिया. अद्यावत तंत्रज्ञान (ultra Sound Energy) वापरुन मोतीबिंदू विरघळून काढला जातो.

### मोतीबिंदू शस्त्रक्रिये नंतर घ्यावयाची काळजी :

शस्त्रक्रिये नंतर सुरवातीचे दोन दिवस विश्रांती घ्यावी. नंतर दैनंदिन कामास सुरवात करण्यास हरकत नाही. दिर्घकाळ विश्रांतीची गरज नाही. आवश्यकता असल्यास नंबरचा चष्मा लावावा लागतो.

### शस्त्रक्रिया त्रासदायक/वेदनादायक असते का ?

शस्त्रक्रिया आवश्यकता असेल तरच भुल देऊन केली जाते. फक्त डोळा बधिर केला जातो (local anaesthesia) जरी डोळा जड वाटला तरी रूग्णाला अस्वस्थ वाटत नाही.
डोळा क्लीप व्दारे (Speculum) पूर्ण उघडा ठेवण्यात येतो. रूग्णाला फक्त उजेड व हालचाल जाणवत राहते.

### लेन्स कशी बसवली जाते ?

लेन्स ची निवड शस्त्रक्रियेआधी करावी लागते. अद्यावत तंत्रज्ञाना व्दारे रूग्णाच्या मापाची लेन्स बनवली जाते.◦ IOL Master आणि Verion व्दारे लेन्सची क्षमता (Power) ठरवली जाते.

### शस्त्रक्रिया गुंतागुतीची होऊ शकते का?

शस्त्रक्रिया करताना अद्यावत तंत्रज्ञान वापरले जाते. त्यामुळे ती सहजपणे करता येते. यश हमखास मिळते. दिसण्याचे प्रमाणसुद्धा वाढते. रूग्णाला जर आधीच वेगळा दोष असेल, जसे दृष्टी पटल दोष (Retina), बाहुली वर फूल, तिरळेपणा, जन्मजात कमी दिसणे इ. दोष मात्र शस्त्रक्रिये नंतर सुध्दा कायम रहातात.
मोतीबिंदू शस्त्रक्रिये दरम्यान काही कारणाने संसर्ग होऊ शकतात जसे रक्तस्त्राव,सूज येणे व दृष्टीपटल अलग होणे (Detachment of Retina) पण प्रमाण अगदी नगण्य असते.

### शस्त्रक्रिये नंतरची तपासणी कधी करावी ?

शस्त्रक्रिये नंतर नेत्रतज्ञांकडून तपासणी करणे आवश्यक आहे. अथवा खालील पैकी त्रास उद्‌भवल्यास त्वरीत सल्ला घेणे आवश्यक आहे.

- दिसण्याचे प्रमाण कमी होणे
- औषधोपचारांनी वेदना कमी न होणे
- डोळ्यामधून पाणी येणे
- शस्त्रक्रिये नंतर उलटी अथवा मळमळणे डोळ्याना मार बसणे/जखम होणे.